N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत जाँच फार्म -I)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा)**:नागपुर शहर  **P.S.(ठाणे):** Beltarodi  **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर** 0046  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/03/2019 18:57 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day** बुधवार  **Date From (दिनांक** 06/03/2019  **Date To ( दिनांक पर्यंत):**06/03/2019

**Time Period (कालावधी):** पहर 4  **Time From** 11:20 बजे  **Time To (वेळेपर्यंत):** 12:10 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले**  **Date (दिनांक ):** 06/03/2019  **Time (वेळ):** 17:37 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा**  **Entry No. (नोंद क्र.):** 028  **Date & Time (दिनांक आणि वेळ)**06/03/2019 18:12 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्तळ):**

**1. (a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा**पश्चिम, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):**मनिष नगर टी पईटजवळील,पटेल गरेजच्या समोरील, नागपूर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे**  **District(State) (जिल्हा**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** अरविंद केशवराव घुले

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती का नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1998  **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):**भारत

**(e) UID No. (यु.आय.डी.**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (अदा केल्याची**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving**

| S.No.(अ.क्र.) | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शातनु कनस्ट्रक्शन सोसायटी,नागपूर ,Beltarodi,नागपुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शातनु कनस्ट्रक्शन सोसायटी,नागपूर ,Beltarodi,नागपुर शहर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**  **Mobile (मोबाइल नं.):** 91-9922731981

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No.(अ. | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री प्रशात रामेश्वर पुरी | | | 1. 1937/B,ऐकनाथ खंते याच्या घरा जवळ बीन, नागपूर ,Beltarodi,नागपुर शहर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

## फिर्याद

अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर
दिनांक ०६/०३/२०१९

मी अरविंद सेवकराम घुले, वय ३४ वर्ष, व्यवसाय–खाजगी (गाडी दुरुस्तीचे गॅरेज) रा. प्लॉट नं.२१ सांतनू कंन्स्ट्रक्शन सोसायटी, बेलतरोडी, नागपूर मो.क्रं. ९९२२७३१९८१

मी वर दिलेल्या पत्यावर राहत असुन दि. ०५.०३.२०१९ रोजी पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांचे समक्ष लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली. पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझी तक्रार संगणकावर टंकलिखीत करून त्यावर सही घेतली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

## तक्रार

अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर
दि. ०५/०३/२०१९

''मी अरविंद सेवकराम घुले, वय.३४ वर्ष, व्यवसाय–खाजगी (गाडी दुरुस्तीचे गॅरेज) रा. प्लॉट नं.२१ सांतनू कंन्स्ट्रक्शन सोसायटी, बेलतरोडी, नागपूर मो.क्रं. ९९२२७३१९८१

माझी तक्रार देतो की, मी वर नमूद पत्त्यावर माझे कुटूंबासोबत राहतो. माझा दुचाकी वाहन दुरुस्तीचा व्यवसाय असून माझे गॅरेज बेलतरोडी टी पॉईटवर आहे. मला माझे राहते घरी दुसरे नवीन मिटरचे कनेक्शन घ्यायचे असल्याने मी ८–१० दिवसापुर्वी एमएससीबी कार्यालय बेसा (बेलतरोडी) येथे गेलो असता नवीन विद्युत मिटर कनेक्शनबाबत माहिती घेतली. तेथील कर्मचाऱ्यांनी मला बेलतरोडी एमएससीबी कार्यालयातील कार्यरत कर्मचारी श्री. पुरी यांचा मोबाईल नंबर ७८७५४४६९०८ हा दिला. मी श्री. पुरी यांना फोन केला असता नविन विद्युत मिटर करिता येणारा खर्च व कोणते कागदपत्रे लागतील याबाबत विचारणा केली असता, नविन विद्युत मिटर घेण्याकरिता लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती दिली व सर्व कागदपत्रे जमा झाले की फोन कर, मी तुमच्या घरी येवून जागा पाहिन असे सांगीतले.

माझेजवळ सर्व कागदपत्रे जमा झालेवर मी दिनांक ०२/०३/२०१९ रोजी श्री. पुरी यांचा मोबाईल क्र. ७८७५४४६९०८ वर फोन केला व सांगीतले की, ''माझे कागदपत्रे पुर्ण झालेले आहे. आपण घर बघण्याकरीता कधी येता असे बोललो तर ते म्हणाले अर्धा तासात मी तुमच्या घरी येतो म्हणाले'' व थोडयाच वेळात माझे घरी आले. तेव्हा मी त्यांना सर्व कागदपत्रे दाखविली आणि मी नवीन विद्युत मिटर बसविणेकरीता किती पैसे लागतील असे विचारले असता श्री. पुरी यांनी रु. ५,०००/– लागतील व पोलपासून घरापर्यंत लागणारा केबल हा तुम्हाला आणावे लागेल असे सांगीतले. मी खात्री केली असता नवीन विद्युत मिटर बसविणेकरीता रू. ५,०००/– लागत नाही. परंतु श्री. पुरी यांनी मला ५,०००/– रुपये सांगीतले व माझे घरून निघुन गेले.

परंतु नविन विद्युत मिटर बसविणेकरीता ५,०००/– रुपये श्री. पुरी यांना लाच रक्कम देण्याची माझी मुळीच इच्छा नसल्याने आज रोजी मी त्यांच्या विरूध्द कायदेशीर कार्यवाही होण्यासाठी तक्रार देत आहे. लाचेमध्ये देण्याकरीता रू ५,०००/– (अक्षरी पाच हजार रू फक्त) आपले कार्यालयात जमा करीत आहे. तसेच माझे श्री. पुरी यांचेशी पुर्वीचे कोणतेही आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार किंवा वैमनस्य नाही, मी त्यांच्या विरूध्द कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे.''

अरविंद से घुले

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (क्र. | Property Category (संपत्ति श्रेणी) | Property Type (सम्पत्ति का | Description (विवरण) | Value(In Rs/-) (मूल्य (रु |
|---|---|---|---|---|

10. **Total value of property (In Rs/-)**-सम्पत्ति का कुल मूल्य(रु में):

11. **Inquest Report / U.D. case No., if any** (मृत्यु समीक्षा रिपोर्ट / यू०डी०प्रकरण सं., यदि कोई हो ):

| S.No. (क्र.सं.) | UIDB Number (यू०डी०प्रकरण सं.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम सूचना तथ्य ):

पोलाल स्टे. बेलतरोडी नागपुर अप क्र 46/18कलम 7(a)भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 2018 घटना ता वेळ- 6/03/19चे 11/20वा पोस्टेला माहीती- 6/03/19चे 17/37वा घटनास्थळ- मनिष नगर टी पईटजवळील पटेल गरेजच्या समोरील चाय टपरीवर फिर्यादी- अरविद केशवराव घुले वय 34 वर्ष, रा. प्लट न. 21 शातनु कनस्ट्रक्शन सोसायटी पोस्टे बेलतरोडी नागपुर आरोपी- श्री प्रशात रामेश्वर पुरी वय 40 रा. प्लट न. 1937/B ऐकनाथ खंते याच्या घरा जवळ बीनाकी नागपुर दाखल अधिकारी पो.हवा. सुरेश शेजव /4070 पोस्टे बेलतरोडी नागपुरतपासी अधिकारी-फालगुन घोडमारे पो.नि. अँन्टी करप्शन ब्यूरो नागपूर विवरअप क्र 46/18कलम 7(a)भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम सन 2018 ण लोकसेवक श्री प्रशात रामेश्वर पुरी वय 40 पद प्रधान तंत्रज्ञ कार्यालय सहा. अभियता महाराष्ट्र वितरण कंपनी रेवती नगर बेसा नागपूर सा. प्लॉट नं. 1937/B ऐकनाथ खंते यांचे घराजवळ बिनाकी नागपूर यांनी आपले लोकसेवक पदाचा दूरपयोग करून माझे घरी नविन विद्युत मिटर बसविण्या करीता 5000/- रूपये स्वताहा करीता लाच रकमेची मागनी करून तडजोडीअंती 4000/- रूपयाची लाच रक्कम लोकसेवक श्री प्रशात रामेश्वर पुरी यांनी स्वीकारली म्हणून माझी त्याचे विरुध्द कायदेशिर फीर्याद आहे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम   Vijay Nimba Talware(I (Inspector)) / PCMH78134   **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):   **Rank** (पद):
**No.**(क्र.):   **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा   **District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

अरविंद के घुले

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाम): Vijay Nimba Talware
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCMH78134

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी दोन शासकीय पंचांला पाचारण करून त्यांची ओळख करून दिली. श्री. फाल्गुन घोडमारे यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी व मी स्वाक्षरी केली व तद्नंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी माझ्याकडून लाचेकरिता वापरण्यात येणारी रक्कम रू. ५,००० (ज्यात रू. ५००/— दराच्या १० चलनी नोटा) घेतल्या त्यावेळी सदरच्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तद्नंतर लाचेच्या रकमेस अँथ्रासीन पावडर लावली. तसेच व्हाईस रेकॉर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहिती दिली.

सापळा पडताळणी कार्यवाही आज दिनांक ०५.०३.२०१९ रोजी सर्वानुमते ठरविण्यात आले. आरोपी श्री. प्रशांत पुरी यांचे कार्यालय सहा. अभियंता महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी रेवती नगर बेसा, नागपूर येथे असल्याने मी माझे दुचाकी वाहन क्र. एम. एच. ३१ बी. डबलु. ६६७९ ने रवाना झालो व माझे मागोमाग पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे, दोन्ही पंच, सापळा पार्टीतील सर्व सदस्य, शासकीय वाहन क्र. एमएच—३१ ए.जी. ९५५२ ने वेळ १६.३० वा. रवाना होवून पर्यावरण नगर, सोमलवाडा नागपूर येथील म.न.पा. नागपूर चे उद्यानाजवळ वेळ १६.५० वा. पोहोचलो. त्यानंतर मी लोकसेवक श्री. प्रशांत पुरी यांना फोन करून कुठे यायचे आहे याबाबत विचारणा केली असता मनिष नगर टि पॉईट जवळील पटेल गॅरेजच्या समोरील चाय टपरीवर बोलाविले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी पंचासमक्ष लोकसेवक यांची लाच रकमेची मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे वेळ १७.०६ वा. व्हाईस रेकॉर्डर सुरू करून पंच क्र. १ यांचेसोबत मला लोकसेवकांकडे लाचेच्या मागणीच्या पडताळणी करण्याकरिता पाठविण्यात आले. मी पंच क्र. १ सह मनिष नगर टि पॉईट जवळील पटेल गॅरेजच्या समोरील चाय टपरीवर गेलो असता तेथे श्री. प्रशांत पुरी हे भेटले. श्री. प्रशांत पुरी यांनी माझे घरी नविन विद्युत मिटर बसविण्याकरिता ५,०००/— रुपये स्वत: करिता लाच रकमेची मागणी केली. परंतु माझेकडे ऐवढे पैसे नसल्याचे सांगुन तडतोडीअंती रू. ४,०००/— ची लाच रकमेची मागणी केली. त्यानंतर वेळ १७.५० वा. पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे व सापळा पार्टी थांबुन असलेल्या ठिकाणी परत येवून पंच क्र. १ यांच्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर बंद केला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून लोकसेवक श्री. प्रशांत पुरी यांनी नविन विद्युत मिटर बसविण्याकरिता ५,०००/— रुपये स्वत: करिता लाच रकमेची मागणी करून तडजोडीअंती रू. ४,०००/— ची लाच रक्कमेची मागणी केल्याची खात्री केली व सापळा कार्यवाही दि. ०६.०३.२०१९ रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर मला घरी जाण्यास सांगुन दि. ०६.०३.२०१९ रोजी सकाळी १०.३० वाजता पर्यावरण नगर, सोमलवाडा नागपूर येथील म.न.पा. नागपूर चे उद्यानाजवळ येण्यास सांगीतले. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी पंचनामा क्र. १ मध्ये घेतल्या आहेत.

मी दिनांक ०६.०३.२०१९ रोजी १०.३० वा. पर्यावरण नगर, सोमलवाडा नागपूर येथील म.न.पा. नागपूर चे उद्यानाजवळ पोहोचलो. त्यानंतर थोडयाच वेळात पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे, दोन्ही पंच, सापळा पार्टीतील सर्व सदस्य, शासकीय वाहन क्र. एमएच—३१ ए.जी. ९५५२ ने वेळ १०.४५ वा. पोहचले. त्यानंतर मी लोकसेवक श्री. प्रशांत पुरी यांना फोन करून कुठे यायचे आहे याबाबत विचारणा केली असता फोन करून सांगतो

अरविंद श्या. घाटे

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused:** ( If known / seen )

(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ | Build (बांधा) | Height(cms.) (उंची(सें.मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities (व्यंग/वैशिष्ट्ये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

असे सांगीतले. थोडयाच वेळात लोकसेवक श्री. प्रशांत पुरी यांचा मला फोन आला व मनिष नगर टि पॉईट जवळील पटेल गॅरेजच्या समोरील चाय टपरीवर बोलाविले. त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. तसेच लोकसेवक यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीचे मार्फतीने लाच रक्कम स्विकारल्यानंतर केसावरून हात फिरविण्याचा इशारा करण्यास मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहात पकडतील असे सांगीतले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी पंचासमक्ष सापळा रचण्यात येणार असल्याचे सांगुन सापळा दरम्यानचे संभाषण व्हाईस रेकॉर्डव्दारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर अॅंथ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम रू. ४,०००/— (ज्यात रू. ५००/— दराच्या ८ चलनी नोटा) माझे शर्टच्या डाव्या खिशात ठेवण्यात आली. त्यानंतर वेळ ११.०९ वा. व्हाईस रेकॉर्डर सुरू करून धाग्याच्या सहायाने माझे गळयात अडकून पंच क्र. १ यांचेसह दुचाकी वाहनाने मनिष नगर टि पॉईट जवळील पटेल गॅरेजच्या समोरील चाय टपरीवर जाण्यास रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागो माग आले. त्यानंतर मी व पंच क्र. १ मनिष नगर टि पॉईट जवळील पटेल गॅरेजच्या समोरील चाय टपरीवर गेलो. थोडयाच वेळात लोकसेवक श्री. प्रशांत पुरी हे आले. लोकसेवक श्री. प्रशांत पुरी यांनी माझेशी माझे कामाविषयी बोलणी करून लाच रकम रू. ४,०००/— ची मागणी केली. त्यानंतर अॅंथ्रासीन पावडर लावलेली लाच रकम रू. ४,०००/— (ज्यात रू. ५००/— दराच्या ८ चलनी नोटा) माझे शर्टच्या डाव्या खिशातून काढून त्यांना देवू केले असता लोकसेवक श्री. प्रशांत पुरी यांनी स्विकारून त्यांनी त्यांचे फुलपॅन्टच्या डाव्या बाजुच्या साईड खिशात ठेवली. त्यानंतर मी सापळा पथकास केसावरून हात फिरवून नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने लोकसेवक श्री. प्रशांत पुरी यास रंगेहात पकडले. त्यानंतर वेळ ११.२६ वा. पंच क्रमांक १ च्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर बंद केला. त्यानंतर सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी पंचनामा क्र. २ मध्ये घेतल्या आहेत.

तरी लोकसेवक श्री. प्रशांत रामेश्वर पुरी वय ४० वर्ष पद—प्रधान तंत्रज्ञ, कार्यालय सहा. अभियंता महाराष्ट्र वितरण कंपनी रेवती नगर, बेसा, नागपूर रा. प्लॉट नं. १९३७/बी एकनाथ खंते यांचे घराजवळ, बिनाकी नागपूर यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून माझे घरी नविन विद्युत मिटर बसविण्याकरिता ५,०००/— रुपये स्वत: करिता लाच रकमेची मागणी करून तडजोडीअंती रू. ४,०००/— ची लाच रक्कम लोकसेवक श्री. प्रशांत पुरी यांनी स्विकारली म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असुन ती ला वाचुन दाखविण्यात आली. ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे

अरविंद रु. घुले

समक्ष

(फाल्गुन घोडमारे)
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर